# <u>Online Help Desk for Students</u>

**Students can contact on any one number for their queries related to MSBTE Summer examinations-**

- **Prof. A.V.Kurkute – 9689882726**
- **Prof. B.P.Patil – 9881420199**
- **Prof.U.S.Shirshetti-9850097381**

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-२६४७८७९५/ ५३१/ २९६/ २६४७०९१६ (वै.) फॅक्स : ०२२-२६४७३९७९

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : director@msbte.com


**महत्वाचे परिपत्रक**

जा.क्र.मरातंशिमं/का-२०/परीक्षा-२०२०/८३

दिनांक 15 MAY 2020

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नित सर्व संस्था.

विषय :- कोव्हिड १९ च्या प्रादुर्भावामुळे व तद्अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरीता मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी गठीत केलेल्या राज्यस्तरीय समितीचा अहवाल ...
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नित पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे नियोजन व शैक्षणिक वेळापत्रकाबाबत

संदर्भ :- १) मा. संचालक तंत्रशिक्षण यांचे पत्र क्र. १०/एनजीपी/२०२०/वेळापत्रक नियोजन/२७४, दि. १२.०५.२०२०.
२) मंडळाच्या विद्वत समितीची बैठक दि. १४.०५.२०२०.

कोव्हिड १९ च्या प्रादुर्भावामुळे व त्याअनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरीता राज्य शासनाने समिती गठीत केली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशी शासनाने स्विकृत केल्याचे व त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये मंडळास प्राप्त झालेले आहेत. सदर शिफारशीच्या अनुषंगाने चर्चा करुन निर्णय घेण्याकरीता मंडळाने दि. १४.०५.२०२० रोजी मंडळाच्या विद्वत समितीची (Academic Committee) बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीतील शिफारशीच्या व निर्णयाच्या अनुषंगाने मंडळाशी संग्लनित सर्व संस्थांना, विद्यार्थ्यांना व पालकांना खालीलप्रमाणे ठळक बाबी माहितीकरिता कळविण्यात येत आहेत.

१. खालीलप्रमाणे अंतिम सत्र/वर्षातील सर्व विद्यार्थ्यांच्या अंतिम सत्र/वर्षाची परीक्षा मंडळामार्फत निर्धारित परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे.
   - सहा सत्राच्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील - सहावे सत्र
   - दोन वर्षाच्या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील - द्वितीय वर्ष
   - तीन वर्ष मायनिंग अभ्यासक्रमातील - तृतीय वर्ष
   - आठ सत्राच्या पार्टटाईम पदविका अभ्यासक्रमातील - आठवे सत्र
   - महाराष्ट्र शासन मान्य अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमाचे - अंतिम सत्र/वर्ष

   अंतिम सत्र/वर्षातील सर्व अनुर्तीण असलेल्या विद्यार्थ्यांना सुध्दा उपरोक्त मंडळामार्फत आयोजित परीक्षा दयाव्या लागतील. उपरोक्त वरील नमूद विद्यार्थ्यांची परीक्षा दि. ०९ जुलै, २०२० पासून घेण्यात येईल व परीक्षेचे सविस्तर विषयनिहाय वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

२. वर नमूद अंतिम सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांचे निम्न सत्र/वर्षाचे असलेले बॅकलॉग विषय तसेच ज्या विद्यार्थ्यांच्या निकाल WFLS किंवा WFLY असतील अशा सर्व विद्यार्थ्यांची बॅकलॉग विषयांच्या परीक्षा संस्थास्तरावर घेण्यात येणार आहे. सदर परीक्षा जुलै, २०२० च्या पहिल्या आठवडयात घेण्यात येईल.

३. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील सम सत्रातील द्वितीय चाचणी परीक्षा व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची तिसरी चाचणी परीक्षा सध्याची परिस्थिती विचारात घेता होणार नाहीत. त्यामुळे सम सत्रातील Sessional marks अथवा PA (अंतर्गत मुल्यमापन) चे गुण मुल्यांकन फक्त प्रथम चाचणी व Micro project (लागू असल्यास) च्या आधारे करण्यात यावेत. तसेच औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील TM चे गुण मुल्यांकन फक्त प्रथम व द्वितीय चाचणी परीक्षेच्या आधारे करण्यात यावे.

४. खालील नमूद नियमित (Regular) विद्यार्थ्यांच्या सैध्दांतिक (Theory) व प्रात्यक्षिक परीक्षा होणार नाहीत.

- सहा सत्राच्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील - द्वितीय व चौथे सत्र
- दोन वर्षाच्या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील - प्रथम वर्ष
- तीन वर्ष मायनिंग अभ्यासक्रमातील - प्रथम व द्वितीय वर्ष
- आठ सत्राच्या पार्टटाईम पदविका अभ्यासक्रमातील - द्वितीय, चौथे व सहावे सत्र
- महाराष्ट्र शासन मान्य अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमाचे - अंतिम सत्र/वर्ष वगळून

वर नमूद सत्र/वर्षाचे निकाल जाहिर करतेवेळी फक्त लगतच्या अगोदरच्या एका सत्र/वर्षाचे ५०% गुणाच्या आधारावर व ज्या सत्र/वर्षाचा निकाल जाहिर करावयाचा आहे त्या सत्र/वर्षाच्या ५०% अंतर्गत गुणाच्या आधारावर गुण देऊन निकाल तयार करण्यात येईल.

**उदा.** द्वितीय सत्रातील नियमित विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्राच्या गुणाची टक्केवारी ६२% असल्यास व द्वितीय सत्रातील अंतर्गत गुणाची टक्केवारी ६६% असल्यास अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत प्रथम सत्राच्या गुणाच्या ५०% व द्वितीय सत्राच्या अंतर्गत गुणाच्या ५०% म्हणजेच ६२/२ + ६६/२ = ६४% गुण देऊन निकाल तयार करण्यात येईल.

तसेच जर पूर्वीच्या परीक्षा किंवा सत्रांचे गुण उपलब्ध नसल्यास विशेष करुन वार्षिक अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षांच्या बाबतीत १०० % अंतर्गत मुल्यमापनावर गुण देण्यात येतील.

**उदा.** प्रथम वर्षातील नियमित विद्यार्थ्यांची अंतर्गत गुणाची टक्केवारी ६६% असल्यास अशा विद्यार्थ्यांचा प्रथम वर्षाच्या निकाल अंतर्गत गुणाचा आधार घेऊन आलेला ६६% याप्रमाणे तयार करण्यात येईल.

५. उपरोक्त मुद्दा क्र. ४ मधील कार्यवाहीनंतर जे विद्यार्थी मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीतील RG ४C नुसार पुढील सत्र/वर्ष प्रवेशासाठी पात्र नसतील (त्यांचा निकाल फेल असेल अथवा एलएसपी असेल) असेही विद्यार्थी पुढील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता प्रवेशासाठी पात्र राहतील. मात्र अशा विद्यार्थ्यांना त्यांचे बॅकलॉगच्या विषयाची परीक्षा (उदा. तृतीय सत्रात प्रवेशित होणा-या विद्यार्थ्यांच्या पहिल्या सत्राचे बॅकलॉग व चौथ्या सत्रातून पाचव्या सत्रात प्रवेशित होणा-या विद्यार्थ्याचे तृतीय, द्वितीय, प्रथम सत्राचे बॅकलॉग विषयाची परीक्षा) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे विषम सत्र संपण्यापूर्वी देणे आवश्यक राहील. सदर विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग विषयाची परीक्षा संस्था स्तरावर घेण्यात येतील. तसेच मुद्दा क्र. ४ प्रमाणे निकाल जाहिर झाल्यानंतर नमूद केलेल्या विद्यार्थ्यांना श्रेणीवाढ हवी असल्यास त्यांचे आवेदन मागवून त्यांची पुढील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील सम सत्रात संस्थास्तरावर परीक्षा घेण्यात येईल.

६. चालू सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांकरिता सत्रकर्म ग्राहय करतांना 'लॉकडॉऊन' चा कालावधी उपस्थिती म्हणून ग्राहय धरण्यात यावा.

७. अंतिम सत्र/वर्षातील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातील व शासन मान्य अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची परीक्षा मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीनुसार तसेच पाठयक्रमातील Teaching Examination Scheme मध्ये नमूद केलेला परीक्षा कालावधी व गुणांकन यामध्ये कोणताही बदल न करता मंडळामार्फत परीक्षा घेण्यात येतील. तथापि दि. १३ मार्च, २०२० पर्यंत सर्वसाधारणपणे सरासरी ९०% अभ्यासक्रम शिकविणे पूर्ण झालेला आहे ही बाब विचारात घेता विद्यार्थी हितास्तव विद्यार्थ्यांस प्राप्त होणारे गुण एकूण गुणांच्या ९०% पैकी मिळाले असे गृहित धरुन विद्यार्थ्यांचे गुण १००% पैकी रुपांतरित करुन देण्यात येतील.

उदा. विद्यार्थ्यांने एकूण ७० गुणाच्या विषयाची परीक्षा दिली व त्यास ७० पैकी ५० गुण प्राप्त झाले अशा वेळेस ७० गुणाचे ९०% म्हणजे ६३ गुण झाले. म्हणजे विद्यार्थ्यांस ७० ऐवजी ६३ पैकी ५० गुण मिळाले असे समजून त्याला ७० पैकी ५६ गुण देण्यात येतील.

(५०÷६३) x ७० = ५५.५६ म्हणजेच ५६

८. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद तसेच शासन मान्य अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील अंतिम सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येतील. सदर परीक्षा स्थानिक परिस्थितीनुसार जूनच्या चौथ्या आठवडयात सुरु होऊन जुलैच्या पहिल्या आठवडयात समाप्त होतील. अंतिम सत्र/वर्षाची प्रात्यक्षिक परीक्षा घेतांना छोटया तुकडया तसेच कमीत कमी वेळेत पूर्ण दिवसात अनेक तुकडया असे करुन घ्याव्यात. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी

अंतर्गत व बाहय परीक्षक त्याच संस्थेचा राहील. मौखिक किंवा प्रात्यक्षिक परीक्षा स्काईप किंवा इतर ऑनलाईन माध्यमातून घेण्यात याव्यात. जर विद्यार्थ्यांस बोलावून परीक्षेस प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसल्यास अशा विद्यार्थ्यांचे जर्नल्स, अंतर्गत परीक्षा व मौखिक परीक्षा या आधारे मुल्यमापन करुन गुण देण्यात यावेत.

९. ज्या विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत उन्हाळी परीक्षा २०२० चे परीक्षा अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याची एक संधी जून, २०२० च्या दुस-या आठवडयात उपलब्ध करुन देण्यात येईल व याबाबतचे स्वतंत्र परिपत्रक काढण्यात येईल.

१०. ज्या विद्यार्थ्यांचे उन्हाळी परीक्षा २०२० चे परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयामार्फत कन्फर्म केलेले आहेत अशाच विद्यार्थ्यांच्या बाबत निकाल प्रक्रिया वरीलप्रमाणे करण्यात येईल.

११. 'I' Scheme मधील चौथ्या सत्रानंतर आयोजित करावयाच्या "Industrial Training" बाबत सविस्तर स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

१२. परीक्षेचे व शैक्षणिक वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| Re-opening of Diploma Institutes | June 15, 2020 (tentative) |
| Pre Examination activities | Up to June 30, 2020 |
| Submission of non-theory e-marksheets by Institutes (Regular Non- final Sem/ Year) | Up to June 30, 2020 |
| Declaration of results of students other than Final Year of Diploma | Up to July 15, 2020 |
| Conduct of examination of Backlog subjects of Final Sem/Year Students (By Institute) | 1 to 8 July, 2020 |
| Conduct of examinations for Final Sem/Year of Diploma (By MSBTE) | From 09th July 2020 onwards |
| Declaration of results of Final Sem/Year of Diploma | First week of August 2020 |
| Commencement of academic year 2020 - 2021:<br>i) For all classes except First Year Diploma<br>ii) For First Year Diploma | i) August 01, 2020<br>ii) September 01, 2020 |

१३. कोव्हिड-१९ च्या उद्रेकामुळे उदभ्वलेल्या परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शंकाचे निरसन व मार्गदर्शन करण्याकरिता मंडळाने विद्यार्थ्यांकरिता हेल्पलाईन सुरु केलेली आहे. तरी संस्थांनी सुध्दा विद्यार्थ्यांकरिता हेल्पलाईन सुरु करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन त्यांचे शंकाचे निरसन करावे.

१४. संस्थेने विद्यार्थ्यांच्या सर्व परीक्षा 'Social distancing' व केंद्र व राज्य शासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन घेण्यात याव्यात.

१५. शासनाच्या निर्देशानुसार परीक्षांच्या नियोजनामध्ये काही बदल करावयाचे झाल्यास सविस्तर सूचना परिपत्रकाद्वारे त्या-त्या वेळी देण्यात येतील.

संस्थेच्या प्राचार्यांनी वरील बाबीं विद्यार्थी व त्यांचे पालक यांना अवगत कराव्यात व वेळोवेळी विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या शंकाचे निरसन व मार्गदर्शन करावे. तसेच उपरोक्त बाबींनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीकरिता —
मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रत माहिती व कार्यवाहीकरीता -

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर.
२) उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.